# राष्ट्रपिता महात्मा गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सावली जि. चंद्रपूर

## वाणिज्य विभाग

"नविन शैक्षणिक धोरण २०२०" या विषयावर अतिथी व्याख्यान प्रा. मुकेश निखाडे

राष्ट्रपिता महात्मा गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय, सावली येथील वाणिज्य विभागातर्फे दिनांक १० सप्टेंबर २०२५ रोजी "नविन शैक्षणिक धोरणाचे महत्व" या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. व्ही. एम. बडवाईक यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. या अतिथी व्याख्यानाला भौतिकशास्त्र विभागाचे प्रा. मुकेश निखाडे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

नविन शैक्षणिक धोरणाचे शिक्षण क्षेत्रातील महत्व या विषयावर मार्गदर्शन करतांना प्रा. शिंगाडे म्हणाले की, आजच्या आधुनिक युगात जागतिक पातळीवर होणारे शैक्षणिक बदल लक्षात घेऊन भारतात देखील बहुआयामी शिक्षण प्रणाली अर्थात नविन शैक्षणिक धोरण २०२० हे लागु करण्यात आलेले आहे. विद्यार्थ्यांच्या आणि देशाच्या सर्वांगीण विकासासाठी हे धोरण अत्यंत महत्वाचे आहे. शिक्षणावरच देशाची आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रगती अवलंबून आहे.

वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. व्ही. एम. बडवाईक आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात म्हणाले की बदलत्या काळानुसार शिक्षणातील बदलांचा स्वीकार करुन देशाच्या प्रगतीसाठी या नविन शैक्षणिक धोरणाचा नक्कीच लाभ होईल.

या व्याख्यानाकरीता प्रा. डॉ. व्ही.बी. पवार तसेच प्रा. डॉ. पी. एस. वैराळे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. वाणिज्य शाखेतील बहुसंख्य विद्यार्थी या व्याख्यानाकरीता उपस्थित होते. या व्याख्यानाला उपस्थित असलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी एकाग्रतेने मार्गदर्शनाचा आस्वाद घेतला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. व्ही. बी. पवार यांनी केले तर बि. कॉम. तृतीय वर्षाची विद्यार्थीनी विद्या भंडारे हिने उपस्थितांचे तसेच ज्यांनी या कार्यक्रमाला सहकार्य केले त्या सर्वांचे आभार व्यक्त केले. अतिथी व्याख्यानाच्या यशस्वीतेसाठी वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

वाणिज्य विभाग प्रमुख

(प्रा. व्ही. एम. बडवाईक )

Scanned with OKEN Scanner







Principal
Rashtrapita Mahatma Gandhi
Arts, Commerce & Science
College, Saoli Dist. Chandrapur

Scanned with OKEN Scanner